**शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून वास्तुशास्त्र परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील विनां अनुदानित संस्थांना बॅचलर ऑफ आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास व सदर अभ्यासक्रम सुरू ठेवण्यासाठी मुदतवाढीस शासनाची मान्यता देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक :- टीईसी-२००९/(२६/०९)/ तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४००००३२

दिनांक :- १५ जून, २००९

संदर्भ : वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. CA/५/Academic- MH०२,
दिनांक २२ एप्रिल, २००९.

**शासन निर्णय :-** उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये वास्तूशास्त्र परिषदेने शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या ३ वर्षांकरीता मुदतवाढ देतांना संस्थेच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमता वाढीसह सुरु ठेवण्यास मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | मान्यतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | बॉम्बे सबर्बन आर्ट अँड क्राफ्ट एज्युकेशन सोसायटीचे एल. एस. रहेजा स्कूल ऑफ आर्किटेक्चर, सेंट मार्टिन रोड, वांद्रे (प.), मुंबई ४०० ०५० | बॅचलर ऑफ आर्किटेक्चर Bachelor of Architecture | ४० वरुन ८० | २००९-१० २०१०-११ २०११-१२ (३ वर्षे) |

वास्तुकला परिषदेची सदर मान्यता लक्षात घेऊन आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून २००९-१०,२०१०-११ व २०११-१२ या तीन वर्षाच्या कालावधीकरिता वर दर्शविलेला अभ्यासक्रम प्रवेशक्षमता वाढीसह सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत वास्तुकला परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच वास्तुकला परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

Scanned with CamScanner

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक ( तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई ( संचालकांमार्फत )
संबंधित संस्था ( संचालकांमार्फत )
मा. मंत्री ( उच्च व तंत्रशिक्षण )यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री ( उच्च व तंत्रशिक्षण ) यांचे खाजगी सचिव
निवडनस्ती
प्रत,
रजिस्ट्रार, वास्तुशास्त्र परिषद, इंडिया हॅबिटेट सेंटर, कोअर-६अ, पहिला माळा, लोधी रोड, नवी दिल्ली- ११० ००३

C:\Documents and Settings\...\My Documents\...\GR ...\New Arch ....doc

Scanned with CamScanner